जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या कामांची खुली चौकशी करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## मृद व जलसंधारण विभाग

**शासन निर्णय क्रमांक: जशिअ-२०२०/प्र.क्र. १२४/जल-७**

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२

**दिनांक: १ डिसेंबर, २०२०**

**प्रस्तावना:**

सर्वांसाठी पाणी टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायम स्वरुपात मात करण्यासाठी दि. ५ डिसेंबर २०१४ च्या शासन निर्णयान्वये जलयुक्त शिवार अभियनाची सुरुवात झाली. सदर अभियानाची मुदत दिनांक ३१ मार्च २०१९ पर्यंत होती. तद्नंतर सदर अभियानास सन २०१८-१९ मध्ये निवडण्यात आलेल्या गावातील कामे पूर्ण करण्यासाठी दि. ३१ मार्च २०२० अखेर मुदतवाढ देण्यात आली होती. सदर अभियान आता संपुष्टात आले आहे. सदर कार्यक्रम अभियान स्वरुपात विविध शासकीय विभाग / स्वंयसेवी संस्था/लोकसहभाग व खाजगी उद्योजक (CSR) यांच्याकडील उपलब्ध निधीतून राबविण्यात आले आहे. सदर अभियाना अंतर्गत २०१५-१६ ते सन २०१८-१९ अंतर्गत निवडलेल्या गावामध्ये सुमारे ६ लाखांच्या वर कामे पूर्ण झालेली आहेत.

२. भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांचा दिनांक ३१ मार्च,२०१९ रोजी संपलेल्या वर्षाचा सामान्य आणि सामाजिक क्षेत्र व सार्वजनिक उपक्रमावरील वर्ष २०२० चा अहवाल क्रमांक -३ मध्ये महालेखापाल यांनी जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या कामांबाबत नोंदविलेल्या मुद्यांवर मा.मंत्रीमंडळाच्या दि.१४/१०/२०२० च्या बैठकीत चर्चा होऊन जलयुक्त शिवार अंतर्गत झालेल्या कामांची खुली चौकशी करण्याचा मा.मंत्रीमंडळाने निर्णय घेतला आहे. त्यास अनुसरुन जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत झालेल्या कामांची खुली चौकशी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:**

मा.मंत्रीमंडळाने दिनांक १४/१०/२०२० रोजी घेतलेल्या बैठकीतील निर्णयानुसार जलयुक्त शिवार योजने अंतर्गत झालेल्या कामांची खुली चौकशी करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. फक्त कामांची संख्या अधिक असल्याने कोणती कामे खुल्या चौकशीसाठी निवडणे आवश्यक आहे याचा शोध घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

समितीची रचना :

| | |
|---|---|
| i) श्री. विजय कुमार, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव | -- अध्यक्ष |
| ii) कार्यरत अतिरिक्त पोलिस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंध विभाग, म.रा. | -- सदस्य |
| iii) श्री. संजय बेलसरे, मुख्य अभियंता जलसंपदा विभाग | -- सदस्य |
| iv) कार्यरत संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे | -- सदस्य |

२. समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे ठरविण्याचे ठरविण्यात येत आहे.

(अ) समितीने भारतीय नियंत्रक व लेखा परिक्षण यांच्या अहवालात नमूद ६ जिल्हयातील १२० गावांमध्ये तपासणी केलेल्या ११२८ कामांपैकी कोणत्या कामांची खुली चौकशी करणे आवश्यक आहे व कोणत्या कामांमध्ये केवळ प्रशासकीय कारवाई /विभागीय चौकशी करणे आवश्यक आहे याची शिफारस संबंधीत यंत्रणांना करावी.

ब) शासनाच्या दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० च्या पत्रान्वये जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५ पासून प्राप्त झालेल्या तक्रारींचा तपशील क्षेत्रिय यंत्रणाकडून मागविण्यात आला असता त्यास अनुसरून साधारणत: ६०० चे वर तक्रारीबाबतची माहिती प्राप्त झालेली होती. सदर तक्रांरीची छाननी करुन त्यानुसार कोणत्या कामांची खुली चौकशी करणे आवश्यक आहे व कोणत्या कामांमध्ये केवळ प्रशासकीय कारवाई /विभागीय चौकशी करणे आवश्यक आहे याची शिफारस संबंधीत यंत्रणांना करावी .

**(क)** याशिवाय सदर समितीने जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या व समितीला आवश्यक वाटेल त्या कोणत्या कामांची खुली चौकशी करणे आवश्यक आहे व कोणत्या कामांमध्ये केवळ प्रशासकीय कारवाई /विभागीय चौकशी करणे आवश्यक आहे याची शिफारस संबंधीत यंत्रणांना करावी.

३. समितीने शिफारस केल्याप्रमाणे संबंधीत यंत्रणांनी संबंधीत कामांची/कामासंदर्भात खुली चौकशी अथवा प्रशासकीय कारवाई / विभागीय चौकशी तात्काळ सुरु करावी.

४. समितीचा कार्यकाळ - समितीने नेमून दिलेल्या कार्यकक्षेनुसार ६ महिन्यांमध्ये कामकाज पूर्ण करावे.

५. समितीने दर महिन्याला शिफारशी केलेल्या सर्व प्रकरणाबाबत अहवाल शासनास सादर करावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२०१२०११५३०५८१८२६ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NAND KUMAR

Digitally signed by NAND KUMAR
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff48786
2cc567ee39, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=dcd3577ebf0e05e2a8b57095c152dc6cfb37c2bb83da19778
8645dd8a362ebc5, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=NAND KUMAR
Date: 2020.12.01 16:14:39 +05'30'

**(नंद कुमार)**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

२. मा. सभापती विधान परिषद यांचे सचिव

३. मा. अध्यक्ष विधानसभा यांचे सचिव.
४. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
५. मा. मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
६. मा. राज्यमंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
७. मा. विरोधी पक्षनेता विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई
८. मा. विरोधी पक्षनेता विधान सभा, विधानमंडळ, मुंबई
९. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव
१०.श्री. विजय कुमार सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव
११.अतिरिक्त पोलिस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंध विभाग, म.रा. मुंबई
१२.श्री. संजय बेलसरे, मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, मुंबई
१३.आयुक्त मृद व जलसंधारण, औरंगाबाद
१४.सर्व विभागीय आयुक्त
१५.संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
१६.अप्पर आयुक्त जलसंधारण, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे व नागपुर
१७.अप्पर आयुक्त जलसंधारण, मृद व जलसंधारण आयुक्तालय, औरंगाबाद
१८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१९.सर्व प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग
२०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता)
२१.सर्व जिल्हाधिकारी
२२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
२३.सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग
२४.सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा/जिल्हापरिषद
२५.सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२६.महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
२७.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
२८. जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व
२९.निवडनस्ती जल-७